सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk१६@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**कार्यालयीन आदेश** — क्रमांक : १६/आस्था/मोटर सायकल अग्रिम/२०२४-२५/१९३

**स्पीड पोस्ट** — दिनांक : १७/१०/२०२४

**पहा : १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-२०२२/प्र.क्र.३३/२०२२/विनियम, दिनांक ०९/१०/२०२३**

**२) शासन ज्ञापन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,क्र.घबांअ-२०२४/प्र.क्र.३१/अर्थसंकल्प कक्ष, दि. ०८/१०/२०२४**

उपरोक्त शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे सोबत जोडलेल्या परिशिष्ठात नमूद केलेल्या या संचालनालयाच्या अधिनस्त संस्था / कार्यालयामधील अधिकारी / कर्मचाऱ्यांना सोबतच्या विवरणपत्रात नमूद इतकी अग्रिम रक्कम त्यांना नवीन मोटार सायकल /स्कूटर खरेदी करण्यासाठी शासनाच्या वरील संदर्भांकित ज्ञापनानुसार उपलब्ध झालेल्या अनुदानातून मंजूर करीत आहेत. त्यांना खालील अटी व शर्ती बंधनकारक असतील.

१. वर मंजूर करण्यांत आलेली रक्कम सदर कर्मचाऱ्यांना त्यांनी वित्तीय प्रकाशन १९५९ मधील नमुना क्रमांक २० मध्ये करारनामा सादर केल्यानंतर त्यांना अदा करण्यांत यावी.

२. मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम १३६,१३७ व १३९ च्या अधीन आणि तसेच खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन सुधारित वेतन मर्यादेनुसार सुधारीत अग्रिम अनुज्ञेय राहील.

३. मोटार सायकल वाहन चालविण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांकडून अनुज्ञप्ती (Permanent Licence) तसेच वाहनांच्या मॉडेलचे नांव, उत्पादनाचे वर्ष, खरेदीची तारीख व त्यासंदर्भाचे नोंदणीचे कागदपत्र तसेच खरेदी केल्याबाबतची (स्टॅम्प रिसिप्ट) इत्यादीबाबतच्या साक्षांकित छायाप्रती या कार्यालयास तीन महिन्याच्या आत सादर कराव्यात.

४. **मात्र एखादा अधिकारी / कर्मचारी नियत वयोमानानुसार उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमूद मासिक हप्ते पूर्ण होण्यापूर्वीच सेवानिवृत्त होणार असेल तर त्याच्या सेवानिवृत्तीपुर्वी संपूर्ण अग्रिमाची व्याजासह वसूली होईल अशाप्रकारे वसूलीचे हप्ते निश्चित करण्यात यावेत.** सदर कर्मचारी निवृत्त होईपर्यंतच्या कालावधीत जर वरील रक्कम व त्यावरील व्याज हे जर नमूद केलेल्या हप्त्यांमध्ये वसूल झाले नाही तर बाकी रक्कम व त्यावरील व्याज त्यांना देय असलेल्या मृत्यु-नि-सेवा निवृत्ती उपदान किंवा त्यांना अथवा त्यांच्या वारसदारांना शासनाकडून देय असलेल्या अन्य रकमेतून वसूल करण्यांत यावे.

५. सदर अग्रिम मंजूरीच्या दिनांकापासून १ महीन्याच्या आत अग्रिम धारकाने खरेदी केलेल्या वाहनाच्या उत्पादनाचे वर्ष,खरेदीची तारीख व नोंदणीचे कागदपत्रे शासनास सादर करावीत. तसे न केल्यास अग्रिम धारकाकडून मुंबई वित्तिय नियम-१९५९ मधील नियम १२४ (बी) व वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक

अग्रिम- १०९५/ प्र.क्र.७०/९५/विनियम, दि. २६/०९/१९९७ मध्ये नमूद तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार लागू ठरण्याऱ्या दंडनीय व्याजाचा उल्लेख मंजूरीच्या आदेशात करण्यात यावा.

६. वाहन अग्रिमाची व्याजासह पूर्ण परतफेड होईपर्यंत वाहन शासनाकडे गहाण राहील. त्यासाठी सबंधित कर्मचाऱ्यास विहित नमुन्यात व कार्यपध्दतीप्रमाणे गहाणखत भरून देणे आवश्यक राहील.

७. अग्रिमाची रक्कम ज्या महिन्यात वितरीत केली असेल त्याच्या पुढील महिन्यापासून अग्रिमाच्या वसूलीस सुरूवात करण्यात यावी.

८. वाहन अग्रिम रकमेच्या नियमित वसुलीसाठी तसेच मंजूर अग्रिम रकमेपेक्षा जादा वसुली होत असल्यास त्यास अर्जदार स्वत: ही जबाबदार राहील.

९. मोटार सायकल, स्कूटर, मोपेड, सायकल व दिव्यांग शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वयंचलित तीन चाकी सायकल, स्कूटर विथ अडॅप्शन व मोपेडचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविण्याची जबाबदारी संबधित अग्रिम धारकाची राहील व तो सतत चालू राहील याची दक्षता घेणे आवश्यक राहील

१०. सायकल /दुचाकी / तीन चाकीसाठी संपूर्ण सेवा कालावधी एकदाच अग्रिम अनुज्ञेय राहील. **तथापि, दिव्यांग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तीन चाकी सायकल खरेदी करीता ही अट शिथिल करण्यात येत आहे.**

११. तसेच अग्रिम धनाची रक्कम मंजूर केलेल्या अग्रिमाच्या पत्राचा क्रमांक, दिनांक व प्रमाणक क्रमांक याबाबतचा तपशिल या संचालनालयास तीन महिन्याच्या आत सादर करावा.

१२. सर्व संस्था / कार्यालय प्रमुखांना कळविण्यांत येते की, ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना अग्रिम मंजूर करण्यांत आलेले आहे त्यांच्या सेवा पुस्तकात सदर अग्रिमाच्या नोंदी घेण्यांत याव्यात.

१३.

| अ. क्र. | तपशील | अग्रिम वसुली कालावधी |
|---|---|---|
| १. | नवीन सायकल खरेदी करण्यासाठी अग्रिम | अग्रिमाची वसूली १० समान मासिक हप्त्यांमध्ये करण्यात यावी. |
| २. | नवीन मोपेड खरेदी करण्यासाठी अग्रिम | अग्रिमाची वसूली व्याजासह ३६ समान मासिक हप्त्यामध्ये करण्यात यावी. प्रथम २४ मासिक हप्त्यांमध्ये मुद्दल व नंतर १२ मासिक हप्त्यांमध्ये व्याज वसूल करण्यात यावे. |
| ३. | नवीन स्कूटर खरेदी करण्यासाठी अग्रिम | अग्रिमाची वसूली व्याजासह ४८ समान मासिक हप्तांमध्ये करण्यात यावी. प्रथम ३६ मासिक हप्त्यांमध्ये मुद्दल व नंतर १२ मासिक हप्त्यांमध्ये व्याज वसूल करण्यात यावे. |
| ४. | नवीन मोटार सायकल, दिव्यांग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वयंचलित किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी अग्रिम | अग्रिमाची वसूली व्याजासह ६० समान मासिक हप्तांमध्ये करण्यात यावी. प्रथम ४८ मासिक हप्त्यांमध्ये मुद्दल व नंतर १२ मासिक हप्त्यांमध्ये व्याज वसूल करण्यात यावे. |

१४. व्याज दराबाबत अन्य आदेश निर्गमित होईपर्यंत या आदेशान्वये मोटार सायकल / स्कूटर / मोपेड / दिव्यांग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वयंचलित किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी मंजूर करण्यात येणाऱ्या अग्रिम प्रकरणी व्याजाची परिगणना वार्षिक ९% या दराने करावी. तसेच दुचाकी सायकल खरेदी अग्रिम हे व्याजरहित राहील.

**या कारणासाठी होणारा खर्च 'उच्च व तंत्रशिक्षण विभाग--मागणी क्रमांक डब्ल्यू--९-७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे-(००)२०२, (००)(०१) मोटार वाहन खरेदी अग्रिमे (७६१० १५३९) ५५ आगाऊ रक्कम' या शिर्षाखाली चालू वर्षी म्हणजेच सन २०२४-२५ साठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीमध्ये उपलब्ध असलेल्या अनुदानाप्रमाणे खर्ची टाकण्यांत यावा. सदर देयके लवकरात लवकर पारीत करुन घेण्यांत यावीत.**

(डॉ. विनोद म. मोहितकर)
**संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. कोषागार / उपकोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, लातूर (मानार्थ) (संबंधित संस्था प्रमुखांमार्फत)
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना असे कळविण्यांत येते की, आपल्या विभागांतर्गत वाटप करण्यांत आलेले अनुदान खर्ची पडल्याबाबतची (देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक) विभागाची एकत्रित माहिती या संचालनालयास तात्काळ पाठविण्यांत यावी.
३. प्राचार्य, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर
४. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, लातूर अ.क्र. २ ते ४ यांना कळविण्यात येते की, अनुदान खर्ची पडल्यानंतर लगेचच त्याबाबतचा तपशिल (देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक) संबंधित विभागीय कार्यालयास तात्काळ पाठविण्यांत यावा. तसेच संबंधित व्यक्तींच्या सेवापुस्तकात अग्रिम मंजुर झाल्याबाबतची नोंद घेण्यांत यावी व संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेशाची छायांकित प्रत देण्यात यावी.
५. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर. (मानार्थ)
६. संचालक, विमा संचालनालय, म्हाडा बिल्डिंग (गृहनिर्माण), पहिला मजला, खोली क्रमांक २६४, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.
७. कार्यासन क्र. १५, १६ मुख्य कार्यालय, मुंबई.

(कार्यालयीन आदेश क्र.१६/आस्था/मो.सायकल/२०२४-२५/१९३ , दिनांक: १७/१०/२०२४ सोबतचे परिशिष्ठ)

-: मोटार-सायकल अग्रिम २०२४-२५ :-

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी यांचे नाव | पदनाम | संस्था / कार्यालयाचे नांव | मंजूर अग्रिम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. ज्ञानोबा दिगंबर सुवर्णकार | कनिष्ठ लिपिक | पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर | १,४५,०००/- |
| २. | श्री. रविंद्रकुमार पंढरी भालेराव | कनिष्ठ लिपिक | पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर | १,४५,०००/- |
| ३. | श्री. आकाश सखाराम लोटे | प्रोग्रामर | पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर | १,४५,०००/- |
| ४. | श्री. अशोक बाबुराव मोहोळे | वरिष्ठ लिपिक | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर | १,४५,०००/- |
| ५. | श्री. ओमकार बस्वलिंग स्वामी | कनिष्ठ लिपिक | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर | १,४५,०००/- |
| | (अक्षरी एकूण रक्कम रुपये सात लाख पंचवीस हजार फक्त) | | | ७,२५,०००/- |

**मोटर सायकल अग्रिम वाटप करण्यांत आलेले एकूण अनुदान (सन २०२४-२५)**

उपरोक्त परिशिष्ठास अनुसरुन संबंधित संस्था प्रमुखास पुढीलप्रमाणे अनुदान सुपूर्द करण्यांत येत आहे. त्यांना कळविण्यांत येते की, उपरोक्त परिशिष्ठात नमूद केल्याप्रमाणे अग्रिमाची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांना आपल्या स्तरावर प्रदान करण्यांत यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ या संचालनालयास सादर करण्यांत यावा.

| अ. क्र. | संस्थेचे नांव / कार्यालयाचे नांव | अनुदान रक्कम (रूपये) |
|---|---|---|
| १. | प्राचार्य, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर | ४,३५,०००/- |
| २. | प्राचार्य, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर | २,९०,०००/- |
| | (अक्षरी एकूण रक्कम रुपये सात लाख पंचवीस हजार फक्त) | ७,२५,०००/- |

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

G:\My Drive\TANDEL DESK १६\Order Motar car Motar Cycle And Computar\सन २०२४ मोटारकार मो. सायकल संगणक ऑर्डर\मोटार सायकल अग्रिम ऑर्डर २०२४-२५ UP.docx